Vol III Issue I Feb 2013
Impact Factor : 0.2105
ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue.1,Feb. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# सहभागी निरीक्षण पद्धती द्वारे गोंदिया तालुक्यातील कटंगटोला गावातील शेतकरी कुटूंबाचा सामाजिक व आर्थिक स्तरांचा अभ्यास

*निता डी. खांडेकर आणि यशवंत एस. मस्करे*

प्रमुख, विस्तार व शिक्षण विभाग,
एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया. (महाराष्ट्र)
व्याख्याता, भूगोल विभाग,
सी.जे. पटेल कॉलेज तिरोडा, जि. गोंदिया (महाराष्ट्र)

*सारांश*

भारत हा विकसनशील देश आहे. भारतातील 70 टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता सर्वच क्षेत्रात उत्पादन क्षमता वाढविणे, शेतीमध्ये नवीन संकरीत बियाने, रासायनिक खते, यंत्रे, अवजारे, रोगनाशके व किटकनाशके, ओलीताच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. प्रत्येक कुटूंब, खेडे, गट व जिल्हा याकरीता एकात्मिक विकास योजना राबविल्या जात आहेत.

## *प्रस्तावना*

खेड्यांचा व खेड्यातील लोकांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे यासाठी लोकांत वैचारिक बदल घडवून आणणे, गावातील लोकांचा सामाजिक व आर्थिक स्तर वाढविणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी अनेक योजना राबविणे आवश्यक आहे.

## *महत्व :–*

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशातील शेतक–यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व त्यांच्या शेतीतील उत्पादन वाढविण्यासाठी अनेक तांत्रिक पद्धतीची निवड केली आहे. शेतक–यांची पिक पद्धती, भाजीपाला, झाडांच्या जाती, जमीन, पाणी व संवर्धन यंत्रे विकसित करण्यात आली आहे. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी विभीन्न जलसिंचनाच्या पद्धती तयार करण्यात आलेल्या आहेत. शेतीतील पिकांचा दर्जा वाढविणे, शेतीतील पिकांचा दर्जा वाढविणे, शेतीचे उत्पादन वाढविणे यासाठी PRA ही पद्धती राबविण्यात येत आहे.

सहभागी ग्रामीणांचे मुल्यांकन या संकल्पनेनुसार '' अशी वाढती प्रक्रिया व माध्यम होय की, ज्यात सामान्य लोकांच्या जीवनाविषयक दृष्टीकोण, योजना व त्यांचा वाढता सहभाग होय''.

''सहभागीय ग्रामीणांचे मुल्यांकन'' या संकल्पनेत सहभाग संशोधन, कृषी पर्यावरणमिमांसा, मानवाचा विकास व उदय शेती संशोधन प्रक्रिया आणि वाढत्या ग्रामीणांचे मुल्यांकन इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव केला जातो. बाहेरच्या व्यक्तींनी ''वाढत्या ग्रामीणांचे मुल्यांकन'' ही संकल्पना आणली आहे, परंतू ''सहभागीय ग्रामीणांचे मुल्यांकन'' या संकल्पनेत स्थानिक लोकांनी सहभाग घेतलेला असतो. लोकांच्या सवयी, आदर व स्वयंमुल्यांकन इत्यादी गोष्टी येतात.

मगील काही वर्षापासून शेती व ग्रामीणांच्या विकासाबाबत खुप बदल घडून आलेला आहे. हा बदल वरपासून तळापर्यंत दिसत आहे. स्थानिक विविधतेतील केंद्रीकरण तसेच शिक्षण प्रणाली इत्यादि स्थानिक शिक्षण प्रणालीत सुक्ष्म बदल झालेला दिसून येतो. सहभागीय ग्रामीणांचा मुल्यांकनात प्रश्नावलीतून त्यांचे मुल्यांकन व मिमांसा तसेच बाहेरील व स्थानिक लोकांनी तसेच शहरी लोकांनी आपल्या कार्यशैलीचा मुल्यांकन केलेला आहे. हया झालेल्या बदलामधून 1980 मध्ये ''सहभागी ग्रामीणांचे मुल्यांकन'' ने महत्वाचे कार्य पार पाडले आहे. वाढत्या ग्रामीणंचे मुल्यांकनाशी सुरूवात सन 1990 मध्ये अधिक प्रमाणात होऊन ''सहभागी ग्रामीणांचे मुल्यांकन'' ही संकल्पना अतिदृढ झालेली आहे.

## *संदर्भ :–*

1) 1980 च्या मध्यावतीत थायलंड येथील खोनकान या विद्यापीठाने सिद्धांत व पद्धतीविषयी जगात महत्वाचे स्थान मिळविले. PRA ला व्यावसयिक स्थान प्राप्त करुन दिले. 1985 मध्ये च्त। वर आंतरराष्ट्रीय सभा घेण्यात आल व ती सभा खोनकान विद्यापीठात पार पडली तसेच त्याविषयी खंड प्रकाशित करण्यात आले. PRA ची खरी किंमत तेव्हा कळली. 1980 नंतर PRA पद्धत विकसित झाली. च्त। ला खरे विकसित करण्याचे कार्य लंडन येथील पर्यावरण संस्थेने पार पाडले व सोबत अफ्रिका व आशियाई संस्थानी मदत केली.

2) घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन संदर्भात गोंदिया जिल्हा परिषदेच्या निर्मल ग्राम युनिटच्या सर्व अधिकारी आणि कर्मचा–यांना ग्रामीणांच्या सहभागी निरीक्षण पद्धतीचे प्रशिक्षण विस्तार अधिक–यांद्वारे माहे सप्टेंबर–2011 मध्ये देण्यात आले.

3) सहभागी ग्रामीणांचे समीक्षण प्रशिक्षण कृषी विज्ञान केन्द्र, हिवरा येथे एकात्मिक पाणलोट विकास व व्यवस्थापनांतर्गत यशदा, पुणे व कृषी विज्ञान केन्द्र, हिवराच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय सहभागी ग्रामीण समीक्षण या विषयावर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या पद्धतीद्वारे विशिष्ट गावाची निवड केली जाते. निवडलल्या गावातील ग्रामस्थांची वैयक्तिक माहिती, गावाचा संपुर्ण इतिहास, 30 वर्षातील पीक पद्धतीचा

**Title :** *सहभागी निरीक्षण पद्धती द्वारे गोंदिया तालुक्यातील कटंगटोला गावातील शेतकरी कुटूंबाचा सामाजिक व आर्थिक स्तरांचा अभ्यास*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850]** *निता डी. खांडेकर आणि यशवंत एस. मस्करे* **yr:2013 vol:3 iss:1**

अभ्यास गावक–यांच्या सहभागाने गावाचा नकाशा काढून तेथील सुक्ष्म नियोजन करण्यास व लोकांच्या समस्या, गरजा ओळखण्यास या पद्धतीचा अवलंब होतो.

PRA Technique – कृती विकास प्रकल्पाकरीता वापरण्यात येणारे तंत्र.

1) ग्रामीण क्षेत्राचा नकाशा किंवा नमुना तयार करणे, रांगोळी किंवा खडूच्या सहायाने सिमेंटच्या जमिनीवर भेट दिलेल्या खेड्याचा नकाशा काढणे, भेट दिलेल्या खेड्यातील घरे, मंदिरे, दुकाने इत्यादि साहित्य व इतर जसे, जंगल, जमीन, पाणलोट क्षेत्र इत्यादींची माहिती नकाशाद्वारे मिळते.

*हेतू :–*

1) ग्राम व ग्रामीणांचा सामाजिक तसेच प्राकृतिक भागांची निश्चित माहिती नकाशाद्वारे मिळविणे.
2) खेड्चा सामाजिक दृष्टीकोण समजून घेणे, तेथे कोण राहतात, कोणत्या गोष्टींची मुबलकता आहे तसेच ते कोठे राहतात या विषयी माहिती मिळविणे.
3) नैसर्गिक पर्यावरणाचे निर्माण झालेले स्त्रोत तसेच खेडूतांनी उपयोगत आणलेल्या गोष्टी माहित करुन घेणे.

*उपयोग :–*

सहभागी नकाशावरून खेडूतांनी धारण केलेली जमीन, प्राणी तसेच विविध विकासात्मक कार्यक्रमांचा घेतलेला लाभ इत्यादींची माहिती मिळते. सहभागी नकाशावरून कोरडवाहू, ओलीतांची जलसिंचीत, जंगलव्याप्त जमीन, नद्या , नाले जसे. इतर पाण्याचे स्त्रोत इत्यादी विषयी माहिती मिळते.

सहभागी नकाशावरुन जमिनीसाठी उपयोगात आणलेल्या कार्यपद्धती, मृदा संवर्धन, वन संवर्धन व विकासात्मक कार्यक्रमाची माहिती मिळते.

*उद्येश :–*

सहभागी निरीक्षण पद्धती द्वारे गोंदिया जिल्हा गोंदिया तालुक्यातील कटंगटोला गावातील शेतकरी कुटूंबाचा सामाजिक व आर्थिक स्तरांचा अभ्यास

*उधिष्टे :–* (Objective)

1) कटंगटोला गावातील लोकांचा आर्थिक स्तर अभ्यासणे.
2) गावातील लोकांचा सामाजिक स्तर अभ्यासणे.
3) लोकांचा व्यावसायिक स्तर अभ्यासणे.
4) गावातील लोकांच्या व्यवसायांचे अध्ययन करणे.
5) शेती व्यतिरिक्त पुरक व्यवसायांचे अध्ययन करणे.
6) शेती व्यवसाय करतांना येणा–या अडचणींचे अध्ययन करणे.
7) गावातील स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक समस्यांचे अध्ययन करणे.

*क्षेत्र :–*

गोंदिया जिल्ह्यातील कटंगटोला हे अध्ययन क्षेत्र घेण्यात आले.




Fig.No:- 2.1

*अध्ययन विश्व :—*

गोंदिया जिल्ह्यातील कटंगटोला या अंतर्गत येणारे 150 कुटूंब हे अध्ययन विश्व आहे.

*नमुना निवड :—*

प्रस्तुत अध्ययनाचे एकक 750 लोकसंख्या मधून 150 कुटूंबाची निवड करण्यात आली.

Bench – Mark Serve याद्वारे अध्ययन करण्यात आले.

विषयाच्या अध्ययनाकरीता प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीमध्ये मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर करण्यात आला असून, या पद्धतीमध्ये माहिती गोळा करण्यात आली.

***ग्रामीण शेतकरी कुटूंबाचा आर्थिक व सामाजिक स्तर :—***

व्यक्ती व समाजाचे अभिन्न असे नाते आहे, त्यामुळे उत्तरदाते कुठल्या सामाजिक पार्श्वभूमीतून आलेले आहेत, हे बघणे अध्ययनाच्या दृष्टीने महत्वाचे असते. व्यक्तीला जगण्यासाठी समाजाप्रमाणे पैशाची आवश्यकता असते. व्यक्तीच्या जीवनात पैशाला महत्वाचे स्थान आहे. मनुष्याच्या आर्थिक स्थितीनुसार त्याचे जीवनस्तर बदलते. आर्थिक स्थिती कमकुवत असेल तर जीवन स्तर घसरतो आणि आर्थिक स्थिती उत्तम असल्यास त्याला सर्व सुख–सोयी प्राप्त करण्यास वेळ लागत नाही. मात्र आर्थिक स्थिती बेताची असल्यास अधिक कष्टमय जीवन जगावे लागते. असे म्हणतात की, सर्व सोंग आणता येतात पण, पैशाचे सोंग आणता येत नाही आणि ही बाब खरी असल्याची प्रत्यक्ष व्यवहारात पदोपदी जाणवते, त्यामुळे उत्तरदाते कुठल्या आर्थिक स्तरातून आलेले आहेत, हे समजून घेणे या दृष्टीने महत्वाचे ठरते.

विभिन्न प्रश्नांच्या स्वरूपावरून सारणी तयार करण्यात आल्या असून, त्याद्वारे निष्कर्ष काढण्यात आलेले आहे.

**1) शेती क्षेत्र :—**

| **शेती क्षेत्र** | | **टक्केवारी** |
|---|---|---|
| हलकी | 80 | 80 टक्के |
| मध्यम | 16 | 16 टक्के |
| भारी | 04 | 04 टक्के |
| **एकुण** | **100** | **100 टक्के** |

गोंदिया जिल्ह्यातील कटंगटोला या गावातील घरांच्या शेतीच्या सर्वेक्षणावरून असे आढळून आले की या गावातील 80 टक्के लोक हलकी शेती तर 4 टक्के भारी शेती करतात.

*2) कोरडवाहू :–*

गोंदिया जिल्हृयातील कटंगटोला या गावातील घरांच्या सर्वेक्षणावरुन असे आढळून आले की, या गावातील 100 टक्के लोक कोरडवाहू शेती करतात.

1) ओलीत क्षेत्र :–

| ओलीत क्षेत्र | | टक्केवारी |
|---|---|---|
| हंगामी | 90 | 90 टक्के |
| बारमाही | 10 | 10 टक्के |
| **एकुण** | **100** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :– वरील सर्वेक्षणावरून आपणास असे आढळून आले की, 90 टक्के लोक हंगामी शेती करतात.

*माती परिक्षण :–*

स्पष्टीकरण :– वरील सर्वेक्षणावरुन आपणास असे दिसून येते की, जास्तीत–जास्त लोकांच्या शेतीमध्ये माती परिक्षण केलेले नाही.

ओलीताची साधने :–

| अ.क. | साधन | पाण्याची उपलब्धता | ओलीताचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1 | विहिर | **40** | **40 टक्के** |
| 2 | नदी नाला | —— | —— |
| 3 | बोरवेल | **60** | **60 टक्के** |
| 4 | कॅनल | —— | —— |
| 5 | बोडी | —— | —— |
| 6 | इतर | —— | —— |
| | एकुण | **100** | **100 टक्के** |

शेतीच्या सर्वेक्षणावरुन असे आढळून आले की, शेतीला पुरवली जाणारी ओलीताची साधने त्यामध्ये विहीर 40 टक्के घरांमध्ये उपलब्ध आहे. तर बोरवेल 60 टक्के घरांमध्ये उपलब्ध आहे.

शिक्षण :–

| अ. क. | शिक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | अशिक्षीत | 11 टक्के |
| 2 | फक्त वाचू शकतो | 05 टक्के |
| 3 | प्राथमिक शिक्षण | 39 टक्के |
| 4 | माध्यमिक शिक्षण | 35 टक्के |
| 5 | उच्च माध्यमिक | 10 टक्के |
| 6 | कनिष्ठ महाविद्यालयीन | 0 टक्के |
| 7 | महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षण | 0 टक्के |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :– वरील सर्वेक्षणावरून आपणास असे आढळून आले की 11 टक्के लोक अशिक्षीत असल्याचे आढळून येते, तर 5 टक्के लोक फक्त वाचू शकतात.

व्यवसाय :—

| अ. क. | व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | अकुशल कामगार | 05 टक्के |
| 2 | जंगल कामगार | — टक्के |
| 3 | शेतमजुर | 35 टक्के |
| 4 | कुशल मजुर | 17 टक्के |
| 5 | कारखाना उद्योगातील कामगार | — टक्के |
| 6 | शेती | 34 टक्के |
| 7 | नोकरी | — टक्के |
| 8 | स्वयंरोजगार | 09 टक्के |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणास असे आढळून आले की 35 टक्के लोक शेतमजुर म्हणुन काम करतात तर 34 टक्के लोक शेतकरी असल्याचे दिसुन येते.

जमीन :—

| अ. क. | जमीन | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 1 हेक्टर पर्यंत | 60 |
| 2 | 1.1 ते 2.0 | 15 |
| 3 | 2.1 ते 3.0 | 20 |
| 4 | 3.1 ते 4.0 | 05 |
| 5 | 4.0 पेक्षा जास्त | — |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणास असे आढळून आले की अधिका अधिक लोक शेती व्यवसाय करतात, त्यामध्ये 60 टक्के घरांमध्ये 1 हेक्टर पर्यंत शेती उपलब्ध आहे तर 5 टक्के घरांमध्ये 3.1 ते 4.0 शेती उपलब्ध आहे.

**सामजिक सहभाग :—**

| अ. क्र. | सामाजिक सहभाग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | पंचायतमध्ये पद | — |
| 2 | गावातील,प्रभारी पुढारी | 60 |
| 3 | स्थानिक पुढारी | 40 |
| 4 | धर्मगुरू | — |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणास असे दिसून येते की, सामाजिक सहभाग म्हणजे पंचायत पद याचे प्रमाण, गावातील प्रभावी पुढारी 60 टक्के तर स्थानिक पुढारी यांचे प्रमाण 40 टक्के आहे.

विस्तार कार्यक्रमामध्ये सहभाग :—

| अ. क्र. | विस्तार कार्यक्रमामध्ये सहभाग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | काहीच नाही | 50 |
| 2 | कधी—कधी | 40 |
| 3 | नेहमी | 10 |
| | एकुण | 100 टक्के |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणास असे दिसून येते की, विस्तार कार्यक्रमात 50 टक्के लोकांचा सहभाग कधीच दिसून येत नाही तर, 10 टक्के लोकांचा सहभाग नेहमी दिसून येते.

शेती अवजारे :—

| अ. क्र. | शेती अवजारे | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | लाकडी नांगर | 50 |
| 2 | लोखंडी नांगर | 18 |
| 3 | वखर | 24 |
| 4 | डवरा | 06 |
| 5 | तिफन / पेरणी यंत्र | — |
| 6 | इतर | 02 |
| | एकुण | 100 टक्के |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणास असे दिसून येते की, विस्तार कार्यक्रमात 50 टक्के लोकांकडे लाकडी नांगर तर, 2 टक्के इतर शेती अवजारे वापरतात.

यंत्र सामुग्री :—

| अ. क्र. | यंत्र सामुग्री | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | स्प्रेअर | 50 |
| 2 | ट्रॅक्टर | 18 |
| 3 | सीड ड्रिल | 24 |
| 4 | ऑईल इंजिन | 30 |
| 5 | पॉवर पंप | 60 |
| 6 | कल्टीव्हेटर | 10 |
| | एकुण | 100 टक्के |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणास असे दिसून येते की, यंत्र सामुग्रीच्या प्रमाणात प्रामुख्याने पॉवर पंप 50 टक्के लोकांकडे तर, कल्टीव्हेटर 10 टक्के लोकांकडे आढळून आले.

**ओलीताचे माध्यम :–**

| अ. क्र. | ओलीताचे माध्यम | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कोणतेही माध्यम नाही | 30 |
| 2 | पारंपारिक | 50 |
| 3 | ठिंबक संच | 10 |
| 4 | तुषार संच | 10 |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :– वरील सर्वेक्षणावरून आपणास असे दिसून येते की, पारंपारिक माध्यम यांचे प्रमाण 50 टक्के आहे तर, तुषार संच यांचे प्रमाण 10 टक्के आहे.

**संप्रेषणाची / माहितीची साधने :–**

| अ. क्र. | संप्रेषणाची / माहितीची साधने | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्र | — |
| 2 | कृषी मालिका / पत्रिका / पुस्तके | — |
| 3 | रेडियो | 19 |
| 4 | टि. व्ही. | 50 |
| 5 | डीश टि.व्ही. / केबल टि. व्ही. | 10 |
| 6 | सी.डी. प्लेअर / टेप रिकार्डर | 01 |
| 7 | टेलिफोन | — |
| 8 | मोबाईल | 20 |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :– वरील सर्वेक्षणावरून आपणास असे दिसून येते की, संप्रेषणाची साधने यात रेडियो यांचे प्रमाण 19 टक्के, दुरदर्शन 50 टक्के, डिश / केबल टि.व्ही. यांचे प्रमाण 10 टक्के, सी.डी. प्लेअर / टेप रिकार्डर यांचे प्रमाण 1 टक्के असून मोबाईलचे प्रमाण 20 टक्के आढळून आले.

**पिकाची तिव्रता :–**

| अ. क्र. | पिकाची तिव्रता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | पेरणीयोग्य जमिन | 60 |
| 2 | एकदा पेरलेले क्षेत्र | 40 |
| 3 | दोनदा पेरलेले क्षेत्र | — |
| 4 | दोन पेक्षा जास्त वेळ पेरलेले क्षेत्र | — |
| 5 | पिक तिव्रता | — |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :– वरील सर्वेक्षणावरून असे आढळून येते की पिकांची तिव्रता ही खालील प्रमाणे दर्शविली आहे. यात पेरणीयोग्य जमिनीचे प्रमाण 60 असून एकदा पेरलेले क्षेत्राचे प्रमाण 40 एवढे आहे.

सामाजिक व आर्थिक माहिती :—

| अ. क्र. | सामाजिक व आर्थिक माहिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | अत्यंत भुधारक : 1.00 हे. पर्यंत | 46 |
| 2 | अल्प भुधारक : 1.1 ते 2.00 हे. पर्यंत | 50 |
| 3 | मध्यम भुधारक : 2.1 हे. ते 6.00 हे. पर्यंत | 04 |
| | **एकुण** | **100 टक्के** |

जमिन विषयक माहिती :—

| अ. क्र. | जमिन विषयक माहिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | लागवडी खालील क्षेत्र | — |
| 2 | ओलीताखालील क्षेत्र | 36 |
| 3 | जिरायत (कोरडवाहू) | 59 |
| 4 | फळ बागेखालील क्षेत्र | — |
| 5 | कृषी वनशेती खालील क्षेत्र | 05 |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणांस असे दिसुन येत आहे की, तेथील लोकांच्या शेतीचे ओलीता खालचे क्षेत्र 36 टक्के आहे. तर जिरायत (कोरडवाहू) क्षेत्र जास्त प्रमाणात असून ते 59 टक्के पर्यंत आहे. तर कृषी वनशेती खालील क्षेत्र हे 05 टक्के दिसून येत आहे.

क्षेत्र :—

| अ. क्र. | क्षेत्र | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | पडीक क्षेत्र | 40 |
| 2 | एकुण क्षेत्र | 60 |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील गावातील शेती सर्वेक्षणावरून आपणास असे म्हणता येईल की, पडीक क्षेत्र हे 40 टक्के आहे. तर एकुण 60 टक्के एकुण क्षेत्र असल्याचे दिसून येत आहे.

उत्पन्न :—

| अ. क्र. | उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | मुख्य धंदयापासून | 70 |
| 2 | इतर धंदयापासून | 30 |
| 3 | एकुण मर्यादा | — |
| 4 | 1) रू. 21000 पर्यंत | — |
| 5 | 2) रू 21001 — 50000/— पर्यंत | — |
| 6 | 3) रू. 50000/— ते 100000/— पर्यंत | — |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून असे आढळून आले की अधिकांश लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. मुख्य धंदयापासून 70 टक्के तर इतर धंदयापासून 30 टक्के उत्पन्नाचे प्रमाण आढळून आले.

**शेतीवर वापरल्या जाणा—या शक्ती :—**

| अ. क्र. | शेतीवर वापरल्या जाणा—या शक्ती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | एक बैलगाडी | 90 |
| 2 | दोन बैलगाडी | 10 |
| 3 | इलेक्ट्रीक मोटार | — |
| 4 | ऑईल इंजिन | — |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून आपणास असे दिसून येते आहे की, शेतीवर वापरल्या जाणा—या शक्ती बैलगाडी हे गावातील शेतीवर प्रामुख्याने वापरतात. एक बैलगाडी यांचे प्रमाण 90 टक्के आहे, तर दोन बैलगाडी यांचे 10 टक्के एवढे इलेक्ट्रीक मोटार व ऑईल इंजीन अत्यंत कमी वापरतात.

**सामाजिक संस्थामधील सहभाग :—**

| अ. क्र. | सामाजीक संस्थामधील सहभाग | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | एका संस्थेचा सभासद | 90 |
| 2 | एका पेक्षा जास्त संस्थेचा सभासद | 10 |
| 3 | संस्थेचा पदाधिकारी | — |
| 4 | प्रसिद्व पुढारी सरपंच, प.स.सदस्य जि.प.अध्यक्ष, आमदार, खासदार ई. | — |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून असे आढळून आले की सामाजिक संस्थेचा सहभाग हा एका संस्थेचा सभासद याचे प्रमाणे 90 टक्के असून एका पेक्षा जास्त संस्थेचा सभासद हे 10 टक्के एवढे आहे.

**शेती व्यतीरिक्त व्यवसाय :—**

| अ. क्र. | शेती व्यतीरिक्त व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | नौकरी | 15 |
| 2 | किराना दुकान | 15 |
| 3 | इतर | 70 |
| | **एकुण** | **100 टक्के** |

स्पष्टीकरण :— वरील सर्वेक्षणावरून असे आढळून आले की शेती शिवाय या गावातील लोक नोकरी करतात व नोकरी यांचे प्रमाण 15 टक्के एवढे असून किराना दुकान असलेले लोकांचे प्रमाण 15 टक्के एवढे दर्शवलेले आहे तर इतर लोकांचे प्रमाण 70 टक्के एवढे आहे.

*निष्कर्ष :—*

या गावातील लोकसंख्या 750 असून या गावात 150 कुटूंब वास्तव्य करतात. कटंगटोला या गावातील शेतकरी कुटूंबाच्या सामाजिक व आर्थिक स्तराचा अभ्यास केला असता असे आढळून आले की, जास्तीत जास्त लोक शेती हा प्राथमिक व्यवसाय करतात. त्याचबरोबर शेतीला जोडधंदा म्हणून अनेक व्यवसाय करतात. जसे बकरी पालन, कुकूट पालन, दुग्ध उत्पादन व मजूरी करतात. परंतू या भागात शेतीमध्ये अनेक पिकांचे उत्पादन घेण्यासाठी विहीर आणि बोअरवेलची सूविधा आहे. परंतू विहीरीला प्रामुख्याने पावसाळयातच पाणी असते.

शैक्षणिक निम्न स्तराचे असल्याचे आढळून आले आहे. कारण बहुतांश लोक प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत. जास्तीत जास्त

लोकांची आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांच्या आवश्यक गरजा पूर्ण होत नाही. या गावातील जास्तीत जास्त लोक शेती हा प्राथमिक व्यवसाय करतात. गावातील लोकांची घरे मातीची परंतु पक्के बांधकाम केलेले आढळते. गावातील अधिकाअधिक लोक हल्की शेती करतात. तसेच जास्तीत जास्त शेती कोरडवाहू आहे. परंतू मातीचे परिक्षण केलेले नाही.

अधिका अधिक लोकांचे वार्षिक उत्पनन 5,000 ⁄ — पर्यंत आहे व जमिनीचे प्रमाण 1 हे. पर्यंत आहे. म्हणजेच 2.5 एकर आहे. कटंगटोला हे गांव गोंदिया या शहराला लागून असल्यामुळे त्याची वेशभुषा आधुनिक आहे. या गावातील लोक शहराकडे जास्त पलायन करतात त्यामुळे विभक्त कुटूंब पत्र्रती दिसून येते.

या गावातील लोकांचा सामाजिक कार्यक्रमात सहभाग जास्त आहे. शेतीची साधने ही कमी प्रमाात उपलब्ध असल्यामुळे पारंपारीक साधनांचा आधूनिक साधनांचा तूलनेत जास्त वापर केला जाते. तसेच शेती करणा—यांकडे गाय, बैल असल्याने शेतीमध्ये जास्तीत — जास्त प्रमाणात जैवीक खतांचा वापर केला जातो.

सहभागी निरीक्षण पद्धतीद्वारे असे आढळून आले की, शेतीमध्ये प्रामुख्याने पारंपारीक ओलीताचे माध्यम वापरले जाते. या गावात दळणवळणाची साधने असून प्रामुख्याने सायकल, बैलगाडी, मोटरसायकल यांचा प्रामुख्याने वापर केला जातो. आजचा काळ आधूनीक आहे. या आधुनीक काळात टि.व्ही. हे संप्रेषणाचे प्रभावी माध्यम आहे व अधिकाअधिक घरात टि.व्ही. या माध्यमाचा वापर केला जातो.

या गावातील सहभागी निरीक्षण पद्धतीवरून असे आढळून आले की, या गावातील शेतकरी कुटूंबाला पाणी अत्यंत कमी प्रमाणात मिळते. या गावात पाण्याची मोठया प्रमाणावर कमतरता दिसून येते. हे गाव गोंदिया या शहराला लागून असल्यामुळे या गावातील लोकांचा व गावाचा विकास कमी प्रमाणात झाला आहे.

### *संदर्भ सुची —*

1)सामुदायिक विकास आणि विस्तार शिक्षण — लेखिका विद्युलता मुळे आणि उज्वला वैरागडे विद्या बुक प्रकाशन, औरंगाबाद.
2)गृहविज्ञान विस्तार शिक्षण — लेखिका त्रिवेणी फरकाडे आणि सुलभ गोंगे विद्या बुक प्रकाशन, नागपुर.
3)सामुदायिक विकास आणि विस्तार शिक्षण — बाबा तिजारे.
4)एज्युकेशन एंड कम्युनिकेशन फॉर डेव्हलपमेंट — ओ.बी. धामा आणि ओ.बी. भटनाकर ऑक्सफर्ड एंड बी.एम. पब्लिशिंग कंपनी, न्यु दिल्ली — 1997.
5)ॲग्रीकल्चरल एक्सटेंशन — पी. मुथैया मनोहरन आणि आर. अरूणाचलम. हिमायल पब्लिशिंग हाऊस.
6)टिचींग एक्सटेंशन एज्युकेशन — एस. के. वाघमारे प्रशांत पब्लिशर, वल्लभ विद्यानगर — 1980.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net